दैनिक
# शुभ प्रभात
SHUBH PRABHAT | एक नव्या युगाचा आरंभ...
विभागीय वृत्तपत्र | www.shubhprabhat.co.in | E-Mail : dainikshubhprabhat@gmail.com
Marathwada : Volume No. 01, Issue No. 269, Marathi Daily Wednesday, Date - 01 April 2026 Price 2 Rupees, Pages - 4 PRGI Reg. No. - MHMAR/25/A1228
मराठवाडा अवृत्ती | वर्ष १ ले | अंक २६९ वा | मराठी दैनिक | बुधवार दि. ०१ एप्रिल २०२६ | किंमत २ रुपये | पाने ४ ABD/544/2025-2027




# साठेबाजीवर कडक बंदी

## नियम तोडणाऱ्यांवर गुन्हा दाखल होणार; जीवनावश्यक वस्तूंवर दरनियंत्रण

**जालना । प्रतिनिधी**




जिल्ह्यात जीवनावश्यक वस्तूंची अवैध साठेबाजी, दरवाढ आणि काळाबाजार रोखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी महत्त्वपूर्ण आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार अन्नधान्य, कडधान्ये, किराणा वस्तू, पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंची विनापरवाना किंवा मंजूर मर्यादेपेक्षा जास्त साठेबाजी करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश निर्गमित करण्यात आला आहे. कोणत्याही व्यापाऱ्याने शासनमान्य दरापेक्षा जास्त दराने किंवा छापील किमतीपेक्षा अधिक दराने वस्तूंची विक्री केल्यास तो गंभीर गुन्हा मानला जाईल. तसेच सर्व व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानात दरपत्रक दर्शनी भागात लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांनी साठवणुकीसंबंधी नियमांचे काटेकोर पालन करावे, अन्यथा साठवणूक मर्यादा ओलांडल्यास संबंधित माल जप्त करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती, संस्था किंवा व्यापाऱ्यांवर जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम ३ व ७ अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आणि पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्यांना आदेशाची तात्काळ (पान २ वर...)

# चिमण्यांसाठी अन्न पाण्याची सोय

## महसूलच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा स्त्सुत्य उपक्रम

**परतूर । प्रतिनिधी**



शहरातील उपविभागीय अधिकारी कार्यालय परिसरात तहसील कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने चिमण्यांसाठी अन्न व पाण्याची सोय करून पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर पक्ष्यांच्या संरक्षणासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरत असून परिसरात सकारात्मक संदेश देण्यात आला.

या उपक्रमाअंतर्गत कार्यालयाच्या परिसरात विविध ठिकाणी चिमण्यांसाठी पाण्याची भांडी व अन्नाची व्यवस्था करण्यात आली. यामुळे उन्हाळ्यात पाण्याअभावी त्रस्त होणाऱ्या पक्ष्यांना दिलासा मिळणार आहे.

यावेळी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, चिमणी हा मानवासाठी अत्यंत उपयुक्त पक्षी असून ती जमिनीतील किडे खाऊन परिसर स्वच्छ व रोगमुक्त ठेवण्यास मदत करते. त्यामुळे चिमण्यांचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. विशेषतः उन्हाळ्यात पक्ष्यांसाठी अन्न व पाण्याची सोय करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या उपक्रमात नायब तहसीलदार संजय चंदन, विनोद भालेराव, एन. एस. बोलचेटवार, नितीन पवार, ज्ञानेश्वर ढवळे, मंगेश लोखंडे, बालाप्रसाद भुतेकर, कृष्णा सोनवणे, नितीन निलेवाड, गजानन पवार, कैलास पिसाळ, बाळासाहेब जाधव आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. (पान २ वर...)



खाजगी पतसंस्थेत पीग्मी जमा करीत असाल तर तुमच्यासाठी खास ऑफर आहे. अधिक माहितीसाठी संपर्क करा
Call Now 7558412574




# भाजपाचे महाप्रशिक्षण अभियान अंतर्गत निवासी प्रशिक्षण वर्ग

**जालना । प्रतिनिधी**



भारतीय जनता पार्टीच्या संघटन बांधणीतील मौलाचा दगड ठरणाऱ्या 'पंडित दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियान-२०२६' अंतर्गत भाजपा जालना महानगरातील नवीन जालना, जुना जालना, पूर्व जालना व ग्रामीण मंडळांचे दोन दिवसीय निवासी प्रशिक्षण वर्ग 'साई लॉन्स, मंठा रोड, राममूर्ती जालना' येथे नुकतेच संपन्न झाले. कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करणाऱ्या या वर्गाचे उदघाटन भाजपा नेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले, तर समारोप माजी मंत्री आ. बबनरावजी लोणीकर यांच्या उपस्थितीत झाला.

यावेळी भाजपा नेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, मंत्री आ. बबनरावजी लोणीकर, आ.भगवानदास सबनानी (पान २ वर...)

# हत्तीरोग निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) मोहिमेला वेग - देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**



महाराष्ट्रासह देशभरात हत्तीरोग (लिम्फॅटिक फिलेरियासिस) निर्मूलनासाठी 'ट्रिपल ड्रग थेरपी' (आयडीए) अर्थात आयव्हरमेक्टिन, डीईसी (डायइथिलकार्बामाझीन) आणि अल्बेंडाझोल या औषधांच्या संयुक्त उपचाराला गती देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२७ पर्यंत भारतातून हत्तीरोगाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या मोहिमेत राज्य शासनाने सक्रिय सहभाग घेतला असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, विशेषतः दुर्लक्षित असलेल्या हत्तीरोगासारख्या आजारांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने सुरुवात केली. देशात २०१७ मध्ये सर्वात प्रथम महाराष्ट्र राज्यात विशेषतः विदर्भातील जिल्ह्यांना या औषधोपचारासाठी सर्वोच्च प्राधान्य देण्याची केंद्र सरकारकडे विनंती केली होती. यामुळे महाराष्ट्रातील, विशेषतः विदर्भातील आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांचे दुःख मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होत आहे. तसेच, देशातून हत्तीरोग निर्मूलन करण्याच्या प्रधानमंत्री यांच्या स्वप्नपूर्तीतही मोठा वाटा उचलून या उपक्रमात महाराष्ट्र शासन पूर्ण सहकार्य देत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या माध्यमातून देशातील १२ राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन' (एमडीए) मोहीम राबवली जात (पान २ वर...)

# लीज व्यवहारात गैरव्यवहाराचा संशय; वित्त मंत्रालयाकडे तक्रार

**जालना । प्रतिनिधी**



बँक ऑफ महाराष्ट्रच्या पुणे येथील लीज व्यवहारात संभाव्य अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त करत खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांना पत्र पाठवून स्वतंत्र व वेळबद्ध चौकशीची मागणी केली आहे. सार्वजनिक निधीची सुरक्षितता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाशी संबंधित हा अत्यंत गंभीर विषय असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

पत्रात डॉ. काळे यांनी म्हटले आहे की, बँक ऑफ महाराष्ट्रने स्वतः च्या मालकीच्या जागेवरील मुख्य कार्यालय हलवून पुण्यातील बाणेर-पाषाण लिंक रोडवरील भाडेतत्त्वावरील जागेत स्थलांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. सुमारे १.२५ लाख चौरस फूट जागेसाठी १५ वर्षांची लीज करण्यात आली असून यासाठी व्याजासह सुमारे १११६ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

पुण्यात बँकेकडे स्वतःची जागा उपलब्ध (पान २ वर...)

# थोडक्यात...

## मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान'

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई शहर झोपडपट्टीमुक्त करण्याच्या उद्देशाने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानाची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. एकीकडे झोपडपट्टी पुनर्विकासाला गती देत दुसरीकडे 'नेत्रम' तंत्रज्ञानाच्या मदतीने नव्या झोपड्या उभारल्या जाऊ नये याची पण काळजी घेतली जाणार आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हे महत्वाचे अभियान राबवून एकप्रकारे बाळासाहेबांना ही आदरांजलीच वाहिली आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

राज्य शासनाच्या या निर्णयामुळे मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास प्रक्रियेला मोठी चालना मिळणार असून, नागरिकांना अधिक सुसज्ज आणि सुरक्षित घरे उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या अभियानाच्या माध्यमातून बाळासाहेब ठाकरे यांच्या स्वप्नातील झोपडपट्टीमुक्त मुंबई साकार करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

या अभियानात किमान ५० एकरपेक्षा जास्त क्षेत्र आणि ५१ टक्क्यांपेक्षा अधिक झोपडपट्टी क्षेत्र असलेल्या समूहांचा समावेश करण्यात येणार आहे. प्रामुख्याने खासगी, सरकारी, निमसरकारी मोठ्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात 'स्लम क्लस्टर रिडेव्हलपमेंट स्कीम' राबविण्यात येईल. यासाठी झोपडपट्टी क्षेत्राची मोजणी करून बायोमेट्रिक सर्वेक्षण केले जाईल. त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए, महाप्रित यांसारख्या संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पूर्वी लहान क्षेत्रफळाच्या सदनिकाधारकांना मोठ्या घरांचा लाभ देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी १८०, २२५ व २६९ चौ.फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येत होत्या. मात्र, आता प्रचलित धोरणानुसार ३०० चौ.फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यासाठी जुन्या प्रकल्पांचे उन्नतीकरण करून पुनर्विकास करण्यात येणार आहे.

या महाअभियानात नेत्रम तंत्रज्ञानाचाही मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येणार आहे. 'नेत्रम'द्वारे उपग्रह डेटा, जीआयएस प्रणाली आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन झोपडपट्ट्या निर्माण होऊ दिल्या जाणार नाहीत. उच्च दर्जाच्या उपग्रह प्रतिमांच्या साहाय्याने नव्याने उभारल्या जाणाऱ्या झोपड्यांचे निरीक्षण केले जाणार आहे.

# मोहाडी रोडवर अवैध देशी दारू विक्रीवर छापा; आरोपीसह माल जप्त

**जालना । प्रतिनिधी**



तालुक्यातील मौजपुरी पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध देशी दारू विक्रीवर कारवाई करत मोहाडी रोडवरील एका हॉटेलमधून आरोपीसह दारूचा साठा जप्त केला आहे. या कारवाईमुळे परिसरातील बेकायदेशीर धंद्यांवर आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. ३० मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास गोपनीय माहितीच्या आधारे मोजपुरी पोलीस ठाण्याचे कर्मचारी प्रदीप पाचरणे, पोहेकॉ खरात आणि ढाकणे हे पथक अवैध धंद्यावर कारवाईसाठी रवाना झाले होते. यावेळी नेर येथून मोहाडीला जाणाऱ्या रोडवरील हॉटेल जाधव अँड चायनीज सेंटर येथे देशी दारूची चोरटी विक्री सुरू असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी दुपारी सुमारे २.३० वाजता संबंधित ठिकाणी छापा टाकला असता तेथे अंकुश महीपत राठोड (वय ३५, रा. मोहाडी, ता. जि. जालना) हा इसम आढळून आला. पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याच्या ताब्यातून सखू संत्रा टंगो प्रीमियम या नावाच्या १८० मिलीच्या (पान २ वर...)

# अंबड चौफुली ते मंठा चौफुली दरम्यान इसमास पुन्हा लुटले

## रिक्षातून लुटमारीच्या घटना वाढल्या; काही दिवसापुर्वीच वकीलालाही लुटले होते

**जालना । प्रतिनिधी**



जालना शहराच्या अंबड चौफुली ते मंठा चौफुली दरम्यान रिक्षातून प्रवास करताना एका वृद्ध शेतकऱ्याची रोकड व कागदपत्रे चोरट्यांनी लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेच्या आधी एका महिलेला आणि एका वकीलालाही लुटल्याची घटना घडली होती. मंगळवार दि. ३१ मार्च २०२६ रोजी रात्री ८ वाजता मिळालेल्या माहितीनुसार या प्रकरणामुळे शहरात पुन्हा एकदा प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.


भोकरदन तालुक्यातील चांदई एक्को येथील रहिवासी एकनाथ रामभाऊ बेडके हे आपल्या मुलीला भेटून परत गावाकडे जात असताना ही घटना घडली. दुपारी सुमारे ३.१५ वाजता खरपुडीकडून जालना शहरात आल्यानंतर जालना पॅलेस हॉटेल परिसरातून मंठा चौफुलीकडे जाण्यासाठी ते एका रिक्षात बसले. या रिक्षात चालकासह तीन अनोळखी इसम आधीपासून बसलेले होते. मंठा चौफुली येथे उतरल्यानंतर भाडे देण्यासाठी खिशात हात घातला असता त्यांचे पाकीट चोरीला गेल्याचे लक्षात आले. त्यांच्या शर्टाच्या खिशातून ५ हजार ८५० रुपये रोख रक्कम तसेच त्यांचे आणि त्यांच्या पत्नीचे आधार कार्ड चोरट्यांनी लंपास केल्याची तक्रार त्यांनी केली आहे.

बेडके यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या शेजारी बसलेल्या एका संशयित व्यक्तीने ही चोरी केली असून तो अंदाजे २५ ते ३० वयोगटातील, सडपातळ बांध्याचा असून जिन्स पॅन्ट व पिवळा शर्ट परिधान केलेला होता. संबंधित व्यक्तीला पाहिल्यास (पान २ वर...)

# आयशर झाडावर आदळून दोन जणांचा मृत्यू

## जालना शहरातील सेंट मेरी शाळेजवळ घडली घटना

**जालना । प्रतिनिधी**



जालना शहरातील सेंट मेरी शाळेजवळ मंगळवारी पहाटेच्या सुमारास भीषण अपघाताची घटना घडली. मंगळवार दि. ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता मिळालेल्या माहितीनुसार भरधाव वेगात असलेले आयशर वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जोरात आदळल्याने चालकासह दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. डुकरी पिंपरी अविनाश लोंढे आणि जिंतूर येथील सुरेष पालवे असे मृत तरुणाचे नाव आहे. या दुर्घटनेमुळे परिसरात भीतीचे आणि हळहळीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास हे आयशर वाहन शहरातून वेगाने जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या मोठ्या झाडावर जोरात धडकले. धडकेचा आवाज एवढा प्रचंड होता की परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघाताची तीव्रता इतकी होती की वाहनाचा पुढील भाग पूर्णपणे चुराडा झाला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी नागरिकांच्या मदतीने दोघांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवले.

प्राथमिक (पान २ वर...)

# जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचे आवाहन

## पाणीपट्टी व मालमत्ता कर वेळेत भरा, अन्यथा एप्रिलपासून कारवाई

**जालना । प्रतिनिधी**




जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी तथा जालना महापालिकेच्या आयुक्त आशिमा मित्तल यांनी नागरिकांना पाणीपट्टी आणि मालमत्ता कर वेळेत भरण्याचे आवाहन केले आहे. या करांमधून मिळणाऱ्या निधीतून शहर व जिल्ह्याच्या विकासकामांना गती मिळणार असल्याने सर्व नागरिक आणि व्यावसायिकांनी आपली जबाबदारी पार पाडावी, असे त्यांनी स्पष्ट केले. मंगळवार दि. ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता त्यांनी प्रसिध्दी माध्यमांना या बाबत माहिती दिली.

श्रीमती मित्तल म्हणाल्या की, अनेक नागरिक आणि व्यावसायिकांनी अद्याप कर भरणा केलेला नाही. कर भरणा टाळल्यास प्रशासनाला कायदेशीर कारवाई करावी लागेल आणि त्यातून कोणालाही सूट दिली जाणार नाही. त्यामुळे सर्वांनी वेळेत कर भरून प्रशासनाला सहकार्य करावे.

तसेच, एप्रिल महिन्यापासून ज्यांनी पाणीपट्टी किंवा मालमत्ता कर भरलेला नाही, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यामध्ये संबंधितांची नावे जाहीर करून प्रसिद्धी दिली जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली. सर्व नागरिकांनी जबाबदार नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडत (पान २ वर...)

## संपादकीय

# महागाईचा भार...

जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी आणि दरवाढ रोखण्यासाठी प्रशासनाने घेतलेली भूमिका ही केवळ कायदेशीरच नव्हे तर सामाजिकदृष्ट्याही अत्यंत आवश्यक आहे. जालना जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केलेला आदेश हा सर्वसामान्य नागरिकांच्या हिताचे संरक्षण करणारा महत्त्वाचा निर्णय मानावा लागेल. आजच्या परिस्थितीत महागाईचा भार आधीच सर्वसामान्यांच्या खांद्यावर आहे. अशा वेळी काही व्यापारी अधिक नफा मिळवण्याच्या उद्देशाने जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी करतात आणि कृत्रिम टंचाई निर्माण करून दरवाढ करतात. हा प्रकार केवळ अनैतिकच नाही तर समाजाच्या आर्थिक समतोलालाही धक्का देणारा आहे. अन्नधान्य, इंधन, गॅस यांसारख्या वस्तू या प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आहेत. त्यामुळे या वस्तूंची उपलब्धता आणि योग्य दर हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे. जिल्हा प्रशासनाने जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कठोर कारवाईचा इशारा देऊन स्पष्ट संदेश दिला आहे की, साठेबाजी आणि काळाबाजार यांना आता स्थान नाही. दरपत्रक दर्शनी भागात लावण्याची सक्ती, साठवणूक मर्यादेचे पालन आणि नियमांचे उल्लंघन केल्यास माल जप्त करण्याची तरतूद ही पारदर्शकता वाढविण्यास मदत करणारी आहे. तथापि, केवळ आदेश काढून समस्या पूर्णपणे सुटत नाही. या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी तितकीच महत्त्वाची आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित तपासण्या करून नियमांचे पालन होत आहे की नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच नागरिकांनीही जागरूक राहून अशा गैरप्रकारांची माहिती प्रशासनाला देणे गरजेचे आहे. याचबरोबर प्रामाणिक व्यापाऱ्यांचेही संरक्षण होणे आवश्यक आहे. सर्व व्यापारी साठेबाजी करत नाहीत, त्यामुळे नियमांची अंमलबजावणी करताना संतुलन राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रशासन, व्यापारी आणि नागरिक या तिघांच्या संयुक्त प्रयत्नातूनच हा प्रश्न प्रभावीपणे हाताळता येईल. एकूणच, साठेबाजीविरोधात उचललेले हे पाऊल स्वागतार्ह आहे. यामुळे बाजारात पारदर्शकता वाढेल, दर नियंत्रणात राहतील आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळेल. आता गरज आहे ती या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी आणि समाजाच्या सक्रिय सहभागाची.



खाजगी पतसंस्थेत पीग्मी जमा करीत असाल तर तुमच्यासाठी खास ऑफर आहे. अधिक माहितीसाठी संपर्क करा
Call Now 7558412574

# नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या 'ई-गव्हर्नन्स'ची राज्यात छाप

राज्याचे द्रष्टे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात १०० दिवसांचा ई-गव्हर्नन्स कृती कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर शासकीय कामकाजात पारदर्शकता आणि डिजिटल सुविधांचा वापर वाढविण्यासाठी १५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमही राज्यात यशस्वीपणे राबविण्यात आला. जिल्हा व विभागीय स्तरावरील विविध कार्यालये व मंत्रालयीन विभाग स्तरावर राबविण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये सर्वोत्कृष्ट कार्यालयांची सात निकषांवर निवड करण्यात आली. यात विभागीय आयुक्त गटात नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने सर्वोत्तम कामगिरी करत राज्यात पहिला क्रमांक पटकाविला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच विभागीय आयुक्त कार्यालयाचा सन्मान करण्यात आला. ई- गव्हर्नन्स सुधारणा संदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयाने केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यावर प्रकाश टाकणारा हा लेख.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या सक्षम नेतृत्वात विभागीय आयुक्त कार्यालयाने वापरकर्ता पूरक संकेतस्थळ निर्माण करून आवश्यक ते सर्व निकष पूर्ण केले व त्याची रीतसर अंमलबजावणी केली. जनतेला राज्य शासनाच्या अधिसूचित सेवांचा लाभ १ कोटींच्यावर लाभ दिला. नागरीकांच्या तक्रारींचे काल मर्यादेत निराकरण केले. ई-ऑफिसद्वारे फाईल व निपटारा प्रक्रिया यशस्वीपणे राबविण्यासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले. केंद्र व राज्य शासनाच्या योजना व कार्यक्रमांच्या माहितीसाठी दृश्य डॅश बोर्ड तयार करण्यात आले. याद्वारे विभागातील कार्यक्षमता निरीक्षणही करण्यात आले. व्हाट्सअपस्नेही चॅट बॉट तयार करण्यात आला. वापरासाठी सुलभ असलेल्या या माध्यमाद्वारे तक्रार निवारण पोर्टल, सीएम व्हाट्सअप चॅनल, धरणे-तलावांच्या पाण्याची पातळी आदी माहिती देण्यात आली. विशेष करून आपत्ती काळात जनतेला सतर्कतेची माहिती देण्यात आली.

'ए आय' आणि 'ब्लॉक चेन' या आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून भारतातील पहिले 'स्मार्ट व इंटेलिजंट गाव सातनवरी' हा प्रकल्प प्रत्यक्षात आला. इतरांसाठी प्रेरक ठरलेला हा प्रकल्प आता राज्यातील ७५ गावांमध्ये रविण्यात येत आहे. राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी जीआयएसचा वापर करून वर्धा जिल्ह्यात 'इंफ्रा युनिक आयडी' तयार करण्यात आली. हा प्रकल्पही उल्लेखनीय ठरला असून राज्यात याची अंमलबजावणी सुरू आहे.

**संकेतस्थळ निकषात उत्तम कामगिरी**

राज्यातील विभागीय आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळ व त्यासाठी घालून दिलेल्या निकषांची उत्तम अंमलबजावणी नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने केली आहे. या अंतर्गत कार्यालयाच्या https://divcomnagpur.maharashtra.gov.in/ संकेतस्थळावर पृष्ठ लोड होण्याची गती २.४ सेकंद झाली आहे त्यामुळेच ते वापरकर्ते स्नेही झाले आहे. शासनाच्या अन्य विभागांची माहिती सहजी उपलब्ध करून देत डोमेन अनुपालन चोखपणे करण्यात आले आहे. देशातील सर्व राजभाषांमध्ये या संकेतस्थळाचा मजकूर उपलब्ध करून देण्यात आला आहे. हे संकेतस्थळ सामान्य जनतेला मोबाईल उपकरण आणि वेब ब्राऊझर वर उपलब्ध करून देण्यात आल्याने वापरकर्त्यांना सहज वापरता येते. संकेतस्थळाला भेट देणाऱ्यांची संख्याही दृष्य स्वरूपात दिसते.

हे संकेतस्थळ दिव्यांग वापरकर्त्यांसाठी सुलभ करण्यात आले आहे. या संकेतस्थळाच्या मालकीचा उल्लेख दर्शवताना सायबर सुरक्षेची काळजी घेण्यात आली आहे. यासंदर्भात सायबर सुरक्षा ऑडिट प्रमाणपत्रही प्राप्त झाले आहे. संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी अद्यावत करण्यात येते तसेच सर्व पुनरुत्पादित कागदपत्रे स्रोतांचा उल्लेख करण्यात येतो. यामध्ये दस्तऐवजांचे शीर्षक, मालक संस्था आणि प्रकाशन तारीख यांचा समावेश आहे. नागरिकांची सनद, माहितीचा अधिकार, नवीन घडामोडी व घोषणांचा समावेश आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर विभागीय संचालक कार्यालय, नागपूर जिल्हा माहिती कार्यालय आणि नागपूर महानगर पालिकेच्या समाज माध्यमांवरील अद्यावत माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**आपले सरकारच्या माध्यमातून जनतेला विविध सेवा**

राज्य शासनाकडून अधिसूचित करण्यात आलेल्या २० सेवांचा लाभ विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांच्या मार्फत जनतेला देण्यात आला. १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निहित कालावधीमध्ये २० कोटी ३ लाख ४७ हजार सेवा जनतेला पुरविण्यात आल्या.सेवा प्रदानतेचा दर ९८.३२ टक्के आहे. यापैकी २१ लाख ९७ हजार ५४८ लोकांनी माहितीच्या अधिकार सेवेचा लाभ घेतला. यातील १ हजार ७८० प्रकरणे पहिल्या अपिलासाठी आले तर २१८ दुसऱ्या अपिलात प्राप्त झाले. शासनाच्या अधिसूचित सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्या. या सर्व सेवा आपले सरकार पोर्टल सोबत जोडण्यात आल्या.नागरिकांच्या तक्रारींचे विहित कालमर्यादेत निराकरण करण्यासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

**ई-ऑफिसचा प्रभावी उपयोग**

विभागीय आयुक्त कार्यालयातील १६४ वापरकर्ते हे ई-ऑफिसचा अवलंब करतात. यातील १५४ वापरकर्ते हे सक्रियपणे ई-ऑफिसचा वापर करतात. १५० दिवसांच्या मोहीम काळात ई-ऑफिसद्वारे फाईलींची प्रक्रिया गतीने करून निपटारा करण्याचा दर ९३.३९ टक्के राहिला. नेहमीच्या पाच टप्प्यांवर फाईल निकाली काढण्याचा दर कमी होऊन तीन टप्प्यांवर आला. ई-ऑफिसच्या हाताळणीसाठी तांत्रिक सहाय्यकाची नेमणूक करण्यात आली. ई-ऑफिसच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले.

**डॅशबोर्डद्वारे माहितीचे अद्यतन व अचूकता**

नागपूर विभागाने विभागीय आयुक्तांच्या 'केआरए' मधील कार्यक्षमता निरीक्षणासाठी नवीन डॅशबोर्ड तयार केला आहे. या डॅशबोर्डची मांडणी व्हिज्युअलायझेशन कस्टम, माहितीची छाननी आणि विभाग निहाय परस्पर संवादी इंटरफेस, माहितीचे अद्यतन आणि अचूकता, भूमिका निहाय प्रवेश नियंत्रण, राज्य व केंद्र शासनाच्या महत्त्वाच्या योजना व कार्यक्रमांचा



यात समावेश करण्यात आला आहे. डॅशबोर्डचा उपयोग महसुली अधिकाऱ्यांद्वारे थेट बैठकांमध्ये माहितीच्या विश्लेषणासाठी होऊ लागला आहे. हे डॅशबोर्ड मोबाईल, वेब ब्राऊजरच्या माध्यमातून सर्वांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. डॅशबोर्डच्या हाताळणी व वापरासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणही घेण्यात आले.

**व्हाट्सअप चॅटबॉटद्वारे सर्वसामान्यांना मोबाईलवर अधिकृत माहिती**

नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने ९३७०४३४६६२ या क्रमांकावर व्हाट्सअप चॅटबॉट जनतेला उपलब्ध करून दिला आहे. आयओएस, अँड्रॉइड आणि वेब प्लॅटफॉर्मवर चॅटबॉट उपलब्ध करून देण्यात आला असून नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांची माहिती, जिल्ह्यांसंबंधित सेवा येथे उपलब्ध करून देण्यात आल्या.पावसाची आकडेवारी, हवामान सूचना, धरण व तलावाची पातळी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विषयक माहिती, आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध करून देण्यासह जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदा तसेच पंचायत समिती कार्यालयांच्या अखत्यारितयेणाऱ्या विविध लोकसेवांचा लाभ याद्वारे देण्यात येतो. सीएम व्हाट्सॲप चॅनल, आपले सरकार पोर्टल, तक्रार निवारण पोर्टल हा चॅटबॉट सोबतही जोडण्यात आला आहे. येथे हेल्पलाईन क्रमांक देण्यात आले असून अभिप्राय प्रणालीचाही यात समावेश आहे.

**'ए आय' व 'ब्लॉकचेन'च्या वापराद्वारे राज्यासमोर निर्माण केले मॉडेल**

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ब्लॉकचेन या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग करून नागपूर ग्रामीण मधील सातनवरी हे गाव देशातील पहिले स्मार्ट इंटेलिजंट गाव ठरले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात आणि विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नेतृत्वात हा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २४ ऑगस्ट २०२५ रोजी या प्रकल्पाचे उद्घाटन केले. मुख्य सचिवांनी या प्रकल्पास भेट देऊन वेळोवेळी आढावा घेतला. या प्रकल्पांतर्गत गावात स्मार्ट आरोग्य, पशुसंवर्धन, ड्रोन नियंत्रित खते व कीटकनाशक फवारणी, सीसीटीव्ही सर्वेलन्स, डिजीटल शिक्षण, महिला व बालकल्याण विभागाच्या ऑनलाईन सेवा, रस्त्यावरील स्मार्ट दिवे इत्यादी सेवा पुरविण्यात आल्या.

स्मार्ट शेतीमुळे २५ ते ४० टक्के पाण्याची बचत होते. खतांच्या किमतीस ३० टक्यांनी कपात होत. उत्पादनात २५ टक्केपर्यंत वाढ होते. ड्रोन द्वारे फवारणीमुळे कीटकनाशकांचा वापर ५० टक्यांपर्यंत कमी होतो. स्मार्ट स्ट्रिट लायटिंगमुळे ऊर्जेचा वापर ५० ते ७० टक्के कमी होऊन देखभाल खर्चही कमी होतो. या प्रकल्पाची दखल घेत स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करून राज्यातील अन्य पाच विभागांमधील ७५ गावांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात येत आहे तर नागपूर जिल्ह्यातील १० गावांचा यात समावेश आहे. प्रकल्पाचा भांडवली खर्च राज्य शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार असून सीएसआर तसेच योग्य संस्थांचे प्रायोजकत्व घेण्याची मुभा या प्रकल्पासाठी देण्यात आली आहे.

**जीआयएसच्या माध्यमातून वर्धा जिल्ह्यात युनिक आयडी**

सातनवरीच्या स्मार्ट इंटेलिजन्स व्हिलेज ची अंमलबजावणी राज्यभर होत असतानाच नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या नेतृत्वात वर्धा जिल्ह्याने तयार केलेल्या जीआयएस आधारित युनिक आयडी ची संकल्पना राज्यभर राबविण्यात येत आहे. नागरी मालमत्तेसाठी इन्फ्रा युनिक आयडी तयार करण्यासाठी समर्पित भूस्थानिक प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला. याद्वारे संपत्ती व मालमत्तेची योग्य नोंद घेण्यात आली. या पद्धतीद्वारे स्थानिक आणि वैशिष्ट्यात्मक डेटा उपलब्ध झाला. त्यातून मिळालेली माहिती गुणवत्ता पूर्ण व अचूक ठरली आणि या माहितीच्या वापराद्वारे विकास कार्यांच्या नियोजनात सुधारणा करण्यात आली.

या माहितीच्या आधारे निर्णय घेणे, नियोजन करणे, निधी वाटप, निधीचा वापर, मालमत्तेचा मागावा घेणे, मालमत्तेची स्थिती, योजनेचा वापर, क्षेत्रनिहाय मालमत्तेचे उपलब्धता नवीन मालमत्तेचा प्रस्तावधी आदींमध्ये या पद्धतीचा उपयोग झाला. वर्धा जिल्हासह नागपूर विभागातील अनेक जिल्ह्यांमध्ये या प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले.

राज्यभरात सात निकषाधारे ७ मे २०२५ ते १० जानेवारी २०२६ दरम्यान एकूण सहा विभागीय आयुक्त कार्यालयांमध्ये ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्यात आला. विभागीय आयुक्त कार्यालयांच्या कामगिरीचे मुल्यमापन कॉलिटी कॉन्सिल ऑफ इंडिया कडून १२७ निकषांवर करण्यात आले.या स्पर्धेत नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाने २०० पैकी १५९.५२ गुण मिळवून राज्यात प्रथम स्थान पटकाविले. २८ एप्रिल २०२६ रोजी मुंबईत एका शानदार समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विभागीय आयुक्तांच्यावतीने महसूल अपर आयुक्त राजेश खवले यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त करत सांगितले की, हा पुरस्कार संपूर्ण नागपूर विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचा परिणाम आहे. ई-गव्हर्नन्सच्या माध्यमातून प्रशासन अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक करण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न राहील. भविष्यातही अधिकाधिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना जलद, सुलभ आणि दर्जेदार सेवा पुरविण्यावर भर दिला जाईल. आयुक्तालयाने मिळविलेला हा पुरस्कार केवळ नागपूर विभागापुरता मर्यादित नसून संपूर्ण राज्यातील प्रशासनासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल.

**रितेश मोतीरामजी भुयार**
**माहिती अधिकारी, माहिती व जनसंर्क, नागपूर**

## पान १ वरुन...

**साठेबाजीवर कडक बंदी...**

अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून संशयास्पद ठिकाणांची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, नागरिकांनीही अशा प्रकारची साठेबाजी किंवा दरवाढ आढळल्यास तत्काळ प्रशासनाला कळवावे, असे आवाहन करण्यात आले असून यासाठी ०२४८२-२२३१३२ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे. या आदेशामुळे जिल्ह्यातील जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर नियंत्रण राहून ग्राहकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**चिमण्यांसाठी अन्न पाण्याची...**

या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागृती निर्माण होत असून पक्षी संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे.

**भाजपचे महाप्रशिक्षण अभियान...**

ग्रा.जिल्हाध्यक्ष आ.नारायणभाऊ कुचे, माजी आ.कैलासजी गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती. या निवासी वर्गाचे वैशिष्ट्य म्हणजे कार्यकर्त्यांनी दोन दिवस एकत्र राहून पक्षाची विचारधारा आणि कार्यपद्धती समजून घेतली. उदघाटन प्रसंगी बोलताना रावसाहेब पाटील दानवे म्हणाले की, भाजप हा केवळ राजकीय पक्ष नसून विचारांनी प्रेरित असलेले कुटुंब आहे, त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या क्षेत्रातील विकासकामांची अचूक माहिती ठेवून जनतेसमोर मांडली पाहिजे. संघटन मजबूत करण्यासाठी केवळ वरच्या पातळीवरचे नेतृत्व पुरेसे नसते, तर तळागाळातील कार्यकर्त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

**हत्तीरोग निर्मूलनासाठी ट्रिपल...**

असून, त्यामध्ये महाराष्ट्राचाही समावेश आहे. या मोहिमेत पात्र नागरिकांना दरवर्षी प्रतिबंधात्मक औषधे दिली जातात, ज्यामुळे रोगाचा प्रसार रोखण्यास मदत होते. राज्यामध्ये विशेष म्हणजे, काही निवडक जिल्ह्यांमध्ये पारंपरिक दोन औषधांऐवजी 'ट्रीपल ड्रग थेरपी' (आयडीए) वापरली जात आहे. ही उपचारपद्धती अधिक प्रभावी मानली जाते आणि कमी कालावधीत रोग नियंत्रणात आणण्यास मदत करते. महाराष्ट्रातील विदर्भ विभागात हत्तीरोगाचा मोठा प्रादुर्भाव असून, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर यासारख्या जिल्ह्यांमध्ये विशेष मोहिमा राबवण्यात येत आहेत. राज्यात सुमारे ५५ लाख नागरिकांना या औषधोपचाराचा लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

**लीज व्यवहारात गैरव्यवहाराचा...**

असताना असा निर्णय वित्तीय दृष्ट्या संशयास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. केवळ सुमारे ६० कोटी रुपये खर्च करून स्वतःच्या जागेवर नवीन इमारत उभारता आली असती, ज्यामुळे कायमस्वरूपी मालमत्ता निर्माण झाली असती आणि दीर्घकालीन खर्चात मोठी बचत झाली असती, असेही त्यांनी स्पष्ट केले.

निविदा प्रक्रियेतील अटींचे पालन झाले आहे का, यावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. यामध्ये पार्किंगची पुरेशी व्यवस्था, रेरा नियमांचे पालन, सलग मजल्यांची उपलब्धता, कार्पेट क्षेत्राचे अचूक मापन तसेच फर्निचर व फिट-आउट खर्चाचे औचित्य यांचा समावेश आहे. या सर्व बाबींची स्वतंत्र चौकशी करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. तसेच या प्रकरणात अंतर्गत सतर्कता यंत्रणेची कार्यक्षमता आणि मुख्य सतर्कता अधिकाऱ्यांची भूमिका तपासण्याची मागणीही त्यांनी केली आहे. लीज अंतिम करण्यापूर्वी आवश्यक ती दक्षता घेतली गेली होती का, याचाही तपास व्हावा, असे त्यांनी नमूद केले. परदेशात राहणाऱ्या भारतीय वंशाच्या गुंतवणूकदारांनी केलेल्या तक्रारींवर अपेक्षित कारवाई न झाल्याची बाबही त्यांनी निदर्शनास आणून दिली असून त्यामुळे भारतीय बँकिंग व्यवस्थेच्या आंतरराष्ट्रीय विश्वासार्हतेवर परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर वित्त मंत्रालयाने या संपूर्ण प्रकरणाची योग्य केंद्रीय यंत्रणेमार्फत स्वतंत्र व वेळबद्ध चौकशी करावी, वित्तीय शिस्त व केंद्रीय सतर्कता आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन झाले आहे का याची पडताळणी करावी, तसेच अनियमितता आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. व्हिसलब्लोअर्सचे संरक्षण सुनिश्चित करून चौकशी अहवाल पारदर्शकपणे जाहीर करण्यात यावा, जेणेकरून जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल, असेही त्यांनी नमूद केले. सार्वजनिक क्षेत्रातील बँकेच्या विश्वासार्हतेशी आणि जनतेच्या पैशांच्या सुरक्षिततेशी संबंधित हा विषय असल्याने यावर तातडीने व निष्पक्ष निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**मोहाडी रोडवर अवैध...**

१२ सीलबंद देशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या. या मालाची एकूण किंमत ९६० रुपये असल्याचे सांगण्यात आले. पोलिसांनी पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करून काही बाटल्या नमुना तपासणीसाठी वेगळ्या काढून सील केल्या असून उर्वरित माल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी अंकुश राठोड याच्याविरोधात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(अ)(ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**अंबड चौफुली ते मंठा...**

ओळखू शकतो, असेही त्यांनी नमूद केले आहे. या प्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी अज्ञात रिक्षाचालक व अन्य तीन इसमांविरोधात गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

**आयशर झाडावर आदळून...**

तपासात वाहनाचा वेग जास्त असल्याने चालकाचे नियंत्रण सुटून अपघात झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. तसेच पहाटेच्या वेळी रस्त्यावर कमी वर्दळ असल्यामुळे वाहनाचा वेग अधिक असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत असून, शहरात वारंवार घडणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याची गरज अधोरेखित होत आहे.

**जिल्हाधिकारी आशिमा मित्तल...**

वेळेत कर भरावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी शेवटी केले.




# शेतकरी केवळ 'उत्पादक' नव्हे तर यशस्वी 'उद्योजक' व्हावा - पणन मंत्री जयकुमार रावल

**मुंबई । प्रतिनिधी**



बदलत्या परिस्थितीत शेतकरी हा केवळ उत्पादक राहून चालणार नाही, तर तो उत्तम उद्योजक बनला पाहिजे. यासाठी पणन विभागाच्या वतीने आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. याचबरोबर शेतीमालाच्या उत्पादनासोबतच त्याचे मार्केटिंग, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि विक्री या सर्व बाबींमध्ये शेतकऱ्यांनी सहभाग घेतला पाहिजे, असे प्रतिपादन पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले. या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हितासाठी शेतकरी उत्पादक संस्थांच्या माध्यमातून चळवळ उभी राहील, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण केंद्र येथे आयोजित शेतकरी उत्पादक संस्थांच्या (एफपीओ) राज्यस्तरीय परिषदेचे उद्घाटन पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना पणन मंत्री रावल म्हणाले, राज्यात सध्या अस्तित्वात असलेल्या बाजार व्यवस्थेपेक्षा अधिक आधुनिक, सुसज्ज आणि जागतिक दर्जाची बाजार साखळी उभारण्याची गरज आहे. यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात वाढवण पोर्ट परिसरात सुमारे १२०० एकरवर अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय दर्जाची बाजार समिती उभारण्याचे नियोजन करण्यात येत आहे. ही बाजारपेठ रस्ता, रेल्वे, बंदर आणि विमानतळाशी जोडलेली असेल, ज्यामुळे राज्यातीलच नव्हे तर देशभरातील शेतीमालासाठी महाराष्ट्र जागतिक व्यापार केंद्र म्हणून उदयास येईल.

राज्यात शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ) आणि शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीसी) या केवळ योजना नसून शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाची मोठी चळवळ असल्याचे मंत्री जयकुमार रावल यांनी नमूद केले. लहान व सीमांत शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांना बाजारपेठेत सक्षमपणे उभे करण्यासाठी या संस्थांची भूमिका महत्त्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

एफपीओच्या माध्यमातून उत्पादन ते विक्रीपर्यंत संपूर्ण मूल्य साखळी उभारता येते. यामध्ये लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि मार्केटिंग या सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देता येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## थोडक्यात...

### नागरिकाभिमुख सेवा, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाधारित व्यवस्थापन यावर भर देत जमाबंदी आयुक्त विभागाची डिजिटल क्रांतीकडे झेप

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमांतर्गत जमाबंदी आयुक्त व भूमी अभिलेख संचालनालयाने (डीएलआर) डिजिटल युगाशी सुसंगत अशी व्यापक आणि प्रभावी कामगिरी नोंदवली आहे. नागरिकाभिमुख सेवा, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाधारित व्यवस्थापन यावर भर देत विभागाने राज्यातील जमीन नोंद प्रणाली अधिक सुलभ, वेगवान आणि विश्वासार्ह केली आहे. यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकताच सर्वोत्तम आयुक्त / संचालक गटातील ६८ सहभागींपैकी दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करुन जमाबंदी आयुक्त कार्यालयाला गौरविण्यात आले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तत्कालीन जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे यांच्या कार्यकाळात ही उल्लेखनीय कामगिरी झाली आहे.

राज्यातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्मपैकी 'महाभूमी' पोर्टल हे एक असून, सात बारा उतारा, ८अ उतारा, प्रॉपर्टी कार्ड, फेरफार नोंदी यांसारख्या सेवा आता १०० टक्के ऑनलाइन उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या सेवांना १.८ अब्जांहून अधिक हिट्स मिळाल्यामुळे नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद आणि विश्वास स्पष्ट झाला आहे.

ई-ऑफिस प्रणालीची राज्यभर मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी करण्यात येत असून ४३० हून अधिक कार्यालयांमध्ये ८२ टक्के अंमलबजावणी पूर्ण झाली आहे. फाईल निपटारा दर ९३ टक्क्यांपर्यंत पोहोचला असून सरासरी तीन दिवसांत कामे पूर्ण होत आहेत. यामुळे प्रशासनातील कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढली आहे.

नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निवारण करण्यासाठी प्रभावी 'ग्रिव्हन्स रिड्रेसल' प्रणाली विकसित करण्यात आली आहे. एसएमएसद्वारे अभिप्राय, दोन स्तरांवरील अपिल यंत्रणा आणि कालबद्ध सेवा वितरणामुळे उत्तरदायित्व अधिक मजबूत झाले आहे. तसेच ४,५०० हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देऊन डिजिटल प्रणालींचा प्रभावी वापर सुनिश्चित करण्यात आला आहे.

नवोन्मेषाच्या दृष्टीने विभागाने 'भूमित्र' चॅटबॉट, व्हॉट्सपद्वारे सेवा, तसेच जीआयएस आधारित ई-मोजणी २.० सारख्या अत्याधुनिक प्रणाली विकसित केल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने मोजणी प्रक्रिया जलद आणि अचूक करण्यात आली असून, ६३५ प्रकरणे एआयद्वारे सोडवण्यात आली आहेत. तसेच 'लँड डॅशबोर्ड'च्या माध्यमातून राज्य, विभाग, जिल्हा ते गाव पातळीपर्यंतच्या माहितीचे विश्लेषण, डेटा व्हिज्युअलायझेशन आणि निर्णय प्रक्रियेसाठी उपयुक्त साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या दृष्टीकोनातून एकसंध 'युनिफाइड लँड मॅनेजमेंट सिस्टीम' (युएलएमएस) विकसित करण्याचेही काम सुरू असून, सर्व जमीन संबंधित सेवा एका प्लॅटफॉर्मवर आणण्याचा प्रयत्न आहे. एकूणच, जमाबंदी आयुक्त कार्यालयाने १५० दिवसांच्या कार्यक्रमात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि कार्यक्षम प्रशासनाचे आदर्श उदाहरण निर्माण केले आहे.

# मारहाण करुन ४५ हजारांची खंडणी उकळली

**मुंबई । प्रतिनिधी**

बिझनेस लोन पुरवठा करणाऱ्या ठाण्यातील ४० वर्षीय व्यक्तीला जाळ्यात अडवून मारहाण करत खंडणी वसूल केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना मिरा-भाईंदरमधील मिरा रोड परिसरात घडली आहे. लोन घेण्याच्या बहाण्याने जाळ्यात ओढून मारहाण करत खंडणी उकळली आहे. या प्रकरणी एका महिलेला अटक करण्यात आली असून तीन फरार आरोपींचा शोध सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्ती बिझनेस लोन प्रोव्हाइड करण्याचे काम करत असून, त्याची ओळख 'टींडर' ॲपद्वारे एका महिलेशी झाली होती. महिलेने स्वतः ला बिझनेस लोनची गरज असल्याचे सांगत संबंधित व्यक्तीला मिरा रोड येथील रामदेव पार्क परिसरात बोलावले आणि डॉक्युमेंट्स घेण्यासाठी भेटण्यास सांगितले. ठरल्याप्रमाणे संबंधित व्यक्ती त्या ठिकाणी पोहोचल्यावर महिलेने त्याला एका घरात नेले. तेथे आधीच दबा धरून बसलेल्या तीन पुरुषांनी त्याच्यावर हल्ला केला. आरोपींनी मारहाण करत दीड लाख रुपयांची मागणी केली व धमकी देत त्याच्याकडून ४५ हजार रुपये उकळून घेतले आणि पसार झाले.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत नगर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संबंधित महिलेचा शोध घेत तिला अटक केली आहे. तिच्याविरोधात भारतीय दंड संहितेच्या कलम ३०९, १२७, १०२, ११५(२), ३५१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या कटात सहभागी असलेल्या इतर तीन आरोपींचा



पोलिसांकडून शोध सुरू असून त्यांचा लवकरच माग काढण्यात येईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

एकीकडे नाशिक येथील भोंदू बाबा अशोक खरात याचे धक्कादायक प्रकरण पुढे येत असताना दुसरीकडे नवी मुंबईत तरूणींना फसवून लैंगिक अत्याचार करणाऱ्या लखोबा लोखंडेच्या मुसक्या नवी मुंबई पोलिसांनी आवळल्या आहेत. मुळात अलिबागचा रहिवाशी असलेल्या आदर्श म्हात्रे याला २२ महिलांचे शोषण केल्या प्रकरणी अटक करण्यात आली आहे. आरोपी आदर्श म्हात्रे याने एकूण १२ वेगवेगळी नावांचे प्रोफाईल तयार केली होती. दहावी नापास असलेला आदर्श म्हात्रे याने शास्त्रज्ञ, उच्चपदस्थ अधिकारी , डॉक्टर असल्याचे भासवून तरुणींना आपल्या जाळ्यात ओढले होते. आदर्श म्हात्रे हा ३५ वर्षांचा असून पहिल्यांदा त्याच्यावर २०१९ ला महिलेचे लैंगिक शोषण केल्याचा गुन्हा दाखल झाला होता. २०२० साली त्याला अटक केल्या नंतर पुढील दोन वर्ष तो जेल मध्ये होता. मात्र परत बाहेर आल्यानंतर त्याने आपली गुन्ह्याची पध्दत सुरूच ठेवली. वेगवेगळ्या मेट्रोमोनियल साईटवर जावून विधवा, घटस्फोटीत, उच्चशिक्षित, गलेलठ्ठ पगार, जास्त वय असलेल्या तरूणींना हेरत होता.

# झोका खेळताना मुलीचा मृत्यू

**बीड । प्रतिनिधी**



बीडच्या माजलगावात धक्कादायक घटना घडली आहे. घरात झोका खेळताना गळ्याला अचानक फास बसून एका नऊ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. खंडोबा मैदान परिसरात ही दुर्दैवी घटना घडली आहे. वृंदा समीर रुद्रवार असे मृत मुलीचे नाव असून ती अवघी ९ वर्षांची होती.

मंगळवारी भगवान महावीर जयंतीनिमित्त शाळेला सुट्टी असल्याने वृंदा आपल्या लहान बहिणीसोबत घराच्या वरच्या मजल्यावर झोका खेळत होती. यावेळी ती खुर्चीवर चढून झोका पकडण्याचा प्रयत्न करत असताना खुर्ची अचानक कलंडली. त्यामुळे झोक्याची दोरी तिच्या गळ्याभोवती अडकून गळफास बसला. या अपघातात तिचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान, वृंदा जेवणासाठी खाली का आली नाही हे पाहण्यासाठी तिची आई वर गेली असता हा प्रकार उघडकीस आला. मुलीची अवस्था पाहून आईने आक्रोश केला. आवाज ऐकून कुटुंबातील इतर सदस्यही धावत आले. त्यांनी तात्काळ वृंदाला रूग्णालयात दाखल केले.मात्र तोपर्यंत खूप उशीर झाला होता. वृंदा दुसरीच्या वर्गात शिक्षण घेत होती. तिच्या आकस्मिक निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# तारा चोरताना मृत्यू; अपघाताचा बनाव फसला

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. हायव्होल्टेज विद्युत तार चोरी करण्याच्या प्रयत्नात अख्खा टॉवरच कोसळल्याने दोन चोरट्यांचा जागीच मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे, घटनेनंतर इतर साथीदारांनी अपघाताचा बनाव रचून मृतदेह परभणीला नेले, मात्र तिथे गेल्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पुणे येथून पाच जणांची एक टोळी केज तालुक्यातील नांदूर घाट शिवारात तारा चोरण्याच्या उद्देशाने आली होती. शनिवारी रात्रीच्या सुमारास हे चोरटे हायव्होल्टेज टॉवरवर चढले आणि तारा कापण्याचे काम सुरू केले. मात्र, याच दरम्यान टॉवर जमिनीवर कोसळला. या भीषण दुर्घटनेत अविनाश पाटोळे आणि आकाश आडे या दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेनंतर घाबरलेल्या इतर तीन साथीदारांनी (आकाश पेठे, दीपक भगत आणि वैभव आदत) पोलिसांपासून वाचण्यासाठी एक शक्कल लढवली. त्यांनी या मृत्यूला 'रस्ते अपघाताचे' स्वरूप



देण्याचा प्रयत्न केला. दोन्ही मृतदेह एका कारमध्ये टाकून त्यांनी थेट परभणी गाठले. परभणीत पोहोचल्यानंतर मृतदेह गाडीतच सोडून तिघेही साथीदार तिथून पसार झाले. गाडीच्या चालकाने जेव्हा रुग्णवाहिकेच्या मदतीने मृतदेह रुग्णालयात दाखल करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा मृतांच्या नातेवाईकांना या घटनेची माहिती मिळाली. नातेवाईकांनी चौकशी केली असता आणि पोलिसांनी तपास चक्रावून फिरवल्यानंतर चोरीचा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या घटनेची माहिती मिळताच परभणी आणि केज पोलिसांनी तात्काळ घटनास्थळाला भेट देऊन पंचनामा केला आहे. टॉवर नेमका कसा कोसळला आणि या टोळीचे आणखी कुठे जाळे पसरलेले आहे का? याचा तपास पोलीस करत आहेत. सध्या पसार झालेल्या आरोपींचा शोध सुरू असून, या घटनेने बीड आणि परभणी जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

# पीएनजीकडे वळा, नाहीतर एलपीजीला रामराम; भुजबळांचा इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

आखातात सुरू झालेल्या युद्धामुळे भारत देश चांगलाच होरपळत आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात उर्जासंकट निर्माण झाले आहे. नैसर्गिक वायू आणि कच्च्या तेलाची भारतात मोठी टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळेच गॅस सिलिंडरची किंमत वाढली आहे. गॅस बुक करूनही लोकांना वेळेवर गॅस सिलिंडर मिळत नाहीये. लोकांना कित्येक तास रांगेत उभे राहावे लागतेय. त्यामुळेच आता महाराष्ट्रात ज्या ठिकाणी पीएनजी कनेक्शन घेणे शक्य आहे, तिथे लवकरात लवकर अर्ज करा. घरात पीएनजी कनेक्शन लावून घ्या, असे आवाहन केंद्र तसेच राज्यातील सरकारकडून केले जात आहे. पीएनजी कनेक्शन लवकरात लवकर दिले जावे यासाठी नियम आणि अटी शिथील करण्यात आल्या आहेत. दरम्यान, याच पीएनजी कनेक्शनबाबत बोलताना अण्ण व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनी मोठी आणि महत्त्वाची माहिती दिली



आहे. त्यांनी तुमचे गॅस सिलिंडर मिळण्याचे कनेक्शन बंद होऊ शकते, असे सांगितले आहे.

ज्या ज्या ठिकाणी पीएनजी कनेक्शन घेणे शक्य आहे, त्या ठिकाणी लवकरात लवकर अर्ज करा, असे आवाहन भुजबळ यांनी केले आहे. तसेच ज्या भागात पीएनजीची व्यवस्था आहे, तिथे पीएनजी कनेक्सनसाठी तीन महिन्यांच्या आत अर्ज करणे गरजेचे आहे. घरगुती असो किंवा व्यावसायिक उद्देशासाठी असो तुमच्या भागात पीएनजीची सुविधा असेल तर त्यांनी तसे कनेक्शन मिळावे यासाठी अर्ज करावा. पीएनजीच्या कनेक्शनसाठी अनेक कंपन्या कार्यरत आहेत. त्यांना राज्यातील वेगवेगळे भाग वाटून दिलेले आहेत, असे भुजबळ यांनी सांगितले.

तसेच, पीएनजीसाठी अर्ज कुठे करावा हे समजत नसेल तर जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे तो अर्ज द्यावा. त्यात पत्ता वगैरे द्या. पीएनजी कनेक्शनची व्यवस्था असल्याने तुम्ही अर्ज केलेला आहे आणि तरीदेखील तुम्हाला पीएनजी कनेक्शन न मिळाल्यास तुमचा एलपीजी पुरवठा बंद होणार नाही. तुम्ही पीएनजीसाठी अर्ज केलेला असल्याने तुम्हाला मिळणारा एलपीजी बंद होणार नाही, असेही भुजबळ यांनी सांगितले. तसेच तुमच्या भागात पीएनजी कनेक्शनची सुविधा असूनही तुम्ही अर्जदेखील केला नसेल तर तुम्हाला मिळणारा एलपीजी बंद होऊ शकतो. जिथे पीएनजीचे काम सुरू आहे, त्याच भागासाठी हा नियम आहे. असेही भुजबळ यांनी स्पष्ट केले आहे.

# ५ लाखांत 'वास्तू दर्शन'; भोंदूबाबा खरात भक्तांना कसा लुटत होता उघड

**नाशिक । प्रतिनिधी**

भोंदूबाबा अशोक खरात याच्या अटकेनंतर आता त्याच्या आर्थिक साम्राज्याचे एकेक पदर उलगडू लागले आहेत. एसआयटी कडून सुरू असलेल्या चौकशीत खरातने भक्तांच्या श्रद्धेचा बाजार मांडून त्यांना कोट्यवधी रुपयांना लुटल्याचे समोर आले आहे. केवळ 'स्पॉट व्हिजिट'साठी हा भोंदूबाबा ५ लाख रुपयांपर्यंत फी आकारत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

अशोक खरात हा भक्तांच्या मानसिकतेचा पूर्णपणे फायदा घेत होता. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, लोकांच्या घरी, कार्यालयात किंवा व्यवसायाच्या ठिकाणी वास्तू पाहण्यासाठी जाण्यासाठी तो तब्बल ५ लाख रुपयांपर्यंत आकारणी करत



असे. भेटीसाठी जाण्यासाठी तो स्वतः च्या नव्हे, तर भक्तांच्या महागड्या गाड्यांची मागणी करत असे. विशेष म्हणजे, काही भक्तांनी त्याला महागड्या गाड्याच भेट म्हणून दिल्याचा संशय असून त्या दृष्टीनेही तपास सुरू आहे.

खरातच्या दरबारात अमावस्या आणि पौर्णिमेला भक्तांची तुफान गर्दी व्हायची. मात्र, या गर्दीतही त्याने आर्थिक भेदाभेद केला होता. जो भक्त जास्त पैसे देईल, त्याला दर्शनासाठी प्राधान्य दिले जात असे. रात्री उशिरापर्यंत हा दरबार सुरू असायचा. अशोक खरातने काही भक्तांकडून तब्बल २० लाखांपर्यंत खर्च करवून घेतल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, शिर्डीतील चार एकर जमिनीच्या खरेदी व्यवहारात फसवणूक केल्याप्रकरणी भोंदू अशोक खरात याच्यासह पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मूळ जमीनमालक रावसाहेब गोंदकर यांच्या फिर्यादीवरून शिर्डी पोलीस ठाण्यात ही कारवाई करण्यात आली.

या प्रकरणात अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात, मध्यस्थ अरविंद बावके, किरण सोनवणे आणि अशोक तांबे यांचा समावेश आहे.

आरोपींनी कर्ज फेडण्यासाठी व्याजाने पैसे देत जमीन बळकावल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

# मारहाणीने त्रस्त तरुणाची आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील मांजरसुंबा परिसरात प्रेमसंबंधांच्या वादातून एका २३ वर्षीय तरुणाने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ज्ञानेश्वर तुकाराम कोकाटे (वय २३) असे मृत तरुणाचे नाव असून, प्रेयसीच्या नातेवाईकांकडून झालेल्या मारहाणीमुळे आणि मानसिक छळामुळे त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मांजरसुंबा येथील ज्ञानेश्वर याचे नेकनूरजवळील एका गावातील तरुणीसोबत प्रेमसंबंध होते. या संबंधांची माहिती मुलीच्या कुटुंबीयांना मिळाल्यानंतर त्यांनी संतापाच्या भरात ज्ञानेश्वरला गावात बोलावून घेतले. त्यानंतर त्याची दुचाकी आणि मोबाईल काढून घेत चार जणांनी मिळून त्याला बेदम मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता, त्याच्यावर चोरीचा खोटा आरोप करत गावात बदनाम केल्याचेही समोर आले आहे.

या मारहाणीमुळे आणि सार्वजनिक बदनामीमुळे ज्ञानेश्वर गंभीर मानसिक तणावाखाली गेला होता. आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये त्याने, मला खूप मारले, गावात चोरटा म्हणून बदनाम केले, तुला जिवे मारून टाकू अशा धमक्या दिल्या, असा उल्लेख केला आहे.

घटनेनंतर ज्ञानेश्वरने धुळे-सोलापूर महामार्गालगत असलेल्या एका टायर पंक्चर दुकानात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, मृताच्या आईने गंभीर आरोप करत म्हटले आहे की, माझ्या मुलाला बोलावून झाडाला बांधून मारहाण करण्यात आली आणि त्याचे व्हिडिओही काढण्यात आले. आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या प्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ओला कॅबमधील गोंधळामुळे ११ वर्षीय मुलगी हरवली

**मुंबई । प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाचा वापर करताना झालेली एक छोटीशी चूक एका कुटुंबासाठी किती भयानक ठरू शकते, याचा थरार कल्याणमध्ये पाहायला मिळाला. ओला कॅबचा ओटीपी दिल्यानंतर प्रवासाला निघालेली ११ वर्षांची चिमुरडी मोठ्या बहिणीपासून ताटातूट होऊन चक्क दुसऱ्या शहराच्या दिशेने रवाना झाली. चालक फोन उचलत नसल्याने दीड तास पालकांच्या आणि पोलिसांच्या काळजाचा ठोका चुकला होता. अखेर कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी तांत्रिक कौशल्याचा वापर करून या मुलीची सुखरूप सुटका केली.

उज्ज्वला माणिक आणि त्यांची ११ वर्षांची लहान बहीण आस्था वर्मा या दोघींना कल्याणहून आपल्या आईला भेटण्यासाठी ठाण्याला जायचे होते. प्रवासाच्या सोयीसाठी त्यांनी दोन ओला कार बुक केल्या होत्या. एक ओला कार बेतूरकर पाडा चौकात पोहोचली. उज्ज्वला यांनी घाईघाईत आस्थाला त्या कारमध्ये बसवले आणि ड्रायव्हरला प्रवासासाठी आवश्यक असलेला ओटीपी दिला. त्याच वेळी दुसरी बुक केलेली कार तिथे आली. उज्ज्वला या दुसऱ्या कारमध्ये सामान ठेवण्यात आणि चालकाशी बोलण्यात गुंतल्या.

ओटीपी मिळताच पहिल्या कार चालकाने आपली गाडी सुरू केली आणि तो आस्थाला घेऊन ठाण्याच्या दिशेने निघून गेला. उज्ज्वला यांना वाटले की आस्था अजून तिथेच आहे, पण काही क्षणातच त्यांच्या लक्षात आले की आपली लहान बहीण ज्या गाडीत बसली होती ती गाडी नजरेआड झाली आहे. उज्ज्वला यांनी तातडीने त्या ओला चालकाला फोन लावण्यास सुरुवात केली, मात्र चालक फोन उचलत नव्हता. धावपळीच्या आणि भीतीपोटी उज्ज्वला यांनी भर चौकात रडण्यास सुरुवात केली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून उपस्थित नागरिकांनी त्यांना धीर दिला आणि तातडीने ११२ या पोलीस हेल्पलाईनवर संपर्क साधला.

या घटनेची माहिती मिळताच महात्मा फुले



पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालकृष्ण परदेशी आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी देखील आपल्या अधिकृत फोनवरून चालकाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र चालकाने पोलिसांचा फोनही उचलला नाही. यामुळे पोलिसांचा संशय बळावला आणि परिसरात अपहरणाची भीती पसरली.

यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपासाची चक्रे वेगाने फिरवली. अखेर दीड तासांच्या प्रयत्नानंतर चालकाने फोन उचलला. तोपर्यंत तो गाडी घेऊन कळव्यापर्यंत पोहोचला होता. वरिष्ठ पोलीस निरीक्षक परदेशी यांनी चालकाला कडक शब्दात विचारले की, तुझ्या गाडीत बसलेली मुलगी कुठे आहे? तेव्हा चालकाने ती मुलगी सुरक्षित असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याला कोणतीही तडजोड न करता गाडी तातडीने पुन्हा कल्याणला वळवण्याचे आणि ज्या ठिकाणाहून मुलीला घेतले होते तिथेच सोडण्याचे आदेश दिले.

साधारण तासाभरानंतर ती ओला कार पुन्हा बेतूरकर पाडा चौकात आली. गाडीतून आपली लहान बहीण आस्था हसऱ्या चेहऱ्याने उतरताना पाहताच मोठी बहीण उज्ज्वला यांना आपले अश्रू अनावर झाले. त्यांनी धावत जाऊन आस्थाला मिठी मारली. पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि एका कुटुंबाची झालेली वाताहत वाचवल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी महात्मा फुले पोलिसांचे आभार मानले आहेत.

This letter is issued by the **Owner Pooja Vishal Ugale** and the **printer, publisher Achut Dagdu More** Printed at Jagamitra Offset Bhokardan Naka, Sambhaji Nagar, Jalna Taluka and District Jalna - 431203 (Maharashtra) And Published at Office Dainik Shubh Prabhat, H.No. 327, Om Shanti Galli, Near Mammadevi Kirana Store, Sambhaji Nagar Jalna, Taluka and District Jalna - 431203 (MAHARASHTRA) Editor **Achut Dagdu More,** Mob. No. 7020871500, **E-mail : dainikshubhprabhat@gmail.com PRGI Registration Number - MHMAR/25/A1228**

**हे पत्र मालक पूजा विशाल उगले आणि मुद्रक, प्रकाशक अच्युत दगडू मोरे यांनी जगमित्र ऑफसेट, भोकरदन नाका, संभाजी नगर जालना, तालुका जिल्हा जालना - ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक शुभ प्रभात, घर नं. ३२७, मंम्मादेवी किराणा जवळ, ओम शांती गल्ली, संभाजी नगर, जालना. तालुका आणि जिल्हा जालना-४३१२०३ (महाराष्ट्र), येथे प्रकाशित केले. संपादक : अच्युत दगडू मोरे, मो.नं. ९८५०५१६७२४, पीआरजीआय नोंदणी क्रमांक - MHMAR/25/A1228, E-mail : dainikshubhprabhat@gmail.com**

# मुरुडमध्ये लाचखोर अभियंत्याचा खरा चेहरा उघड!

## २.५ लाखांची लाच घेताना रंगेहाथ पकडले; ACB च्या जाळ्यात सापडली श्रद्धा बो-हाडे

**रेवदंडा । निलेश फुंडे**

मुरूड येथे सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता श्रद्धा बो-हाडे यांचा लाचखोर चेहरा आता उघड झाला आहे. ठेकेदाराकडून ३ लाखांची लाच मागितल्यानंतर तडजोडीने २.५ लाखांवर समाधान मानून ती रंगेहाथ पकडली गेली. अँटी-करप्शन ब्युरो रायगड-अलिबागने केलेल्या सापळ्यात ही भ्रष्ट अधिकारी ताब्यात घेतली असून, तिच्या कारकिर्दीला मोठा धक्का बसला आहे.

सन २०२४ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबागकडून मुरूड-एकदरा-राजापुरी-खोकरी रोडवरील किमी ५/२७० च्या बाजूचे स्लॅब ड्रेन कामाचा टेंडर मिळवलेल्या ठेकेदाराने काम पूर्ण केले. पण फायनल बिल इस्टीमेट तयार करण्यासाठी सा.बां. उपविभाग मुरूडच्या कनिष्ठ अभियंता श्रद्धा बो-हाडे यांनी तब्बल ३ लाखांची लाच मागितली. नाकारल्यावर तिने तडजोडीने २.५ लाखांवर शिक्कामोर्तब केले. याबाबत दि. २८ मार्च रोजी ठेकेदाराने ACB रायगड-अलिबागकडे तक्रार दाखल केली.-उइ ने तक्रारीची पडताळणी केली असता बो-हाडे यांनी लाचेची मागणी आणि स्वीकृती मान्य केली. दि. ३० मार्च रोजी मुरूड येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयात सापळा रचला असता, बो-हाडे यांनी ठेकेदाराकडून पंचांसमोर २,५०,००० रुपये रोख स्वीकारताना रंगेहाथ पकडल्या गेल्या.

ही कारवाई पोलीस अधीक्षक शिवराज पाटील (ACB ठाणे), अपर पोलीस अधीक्षक भागवत सोनवणे व सुहास शिंदे (ACB ठाणे), पोलीस उपाधीक्षक सरिता भोसले (जेसीबी रायगड) यांच्या मार्गदर्शनाखाली पीआय निशांत धनवडे, पीआय नारायण सरोदे, विनोद जाधव, अरूण करकरे, महेश पाटील, सुमित पाटील, सचिन आटपाडकर, नवदीत




नांदगांवकर, मोनिका मोरे (ACB रायगड-अलिबाग) यांनी यशस्वी केली.भ्रष्टाचाराचे जाळे: राजकीय पुढारी, ठेकेदार आणि अधिकाऱ्यांचा खेळ!लाच देणारा आणि घेणारा दोघेही गुन्हेगार! काम अडेल या भीतीने पैसे देणे म्हणजे भ्रष्टाचाराला खतपाणी घालणे. अनेक ठेकेदार दुप्पट-तिप्पट बिल बनवून श्रीमंत होण्याचे स्वप्न पाहतात, मंजुरीसाठी अधिकाऱ्यांना लाच देतात. यात राजकीय पुढारींची टक्केवारीची गुतागुती असते - माझे कमिशन मला मिळायला हवे असा दबाव! अशा साखळीत कोणीतरी अडकतोच.

मुरूड प्रकरणाने हे जाळे उघड झाले आहे. लाच देणे-घेणे हा गुन्हाच आहे; यात सर्वजण समान दोषी!या प्रकरणाने सरकारी कार्यालयातील भ्रष्टाचाराची कळ येईल अशी शक्यता आहे. ACB कडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, लाच मागणाऱ्या लोकसेवकांबाबत माहिती असल्यास तात्काळ संपर्क साधावा. भ्रष्टाचाराच्या विरोधात ACB कठोर कारवाई करत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# फेअरनेस क्रीम्सचा घातक खेळ उघड

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

गोरं होण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पाकिस्तानी क्रीम्समुळे थेट किडनीवर परिणाम होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शहरात बंदी असलेल्या या सौंदर्य प्रसाधनांची सर्रास विक्री होत असल्याचं उघड झाल्यानंतर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.सिटी चौक पोलिसांनी धाड टाकत तब्बल ६० हजार रुपयांची क्रीम्स, साबण आणि सिरम जप्त केली असून तिघांना अटक करण्यात आली आहे.

बंदी असलेल्या पाकिस्तानी क्रीम्सची विक्री सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी शहागंज, घासमंडी आणि सिटी सेंटर मॉल परिसरातील दुकानांवर कारवाई केली. 'हायलाईट कलेक्शन', 'ओम ट्रेडर्स' आणि 'फलक इम्पोरियम' या दुकानांमधून मोठ्या प्रमाणात माल जप्त करण्यात आला. एकूण ५९ हजार ९८० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.




पोलिसांच्या या कारवाईत मल्लिका, झलक, गोरे, गोल्डन पर्ल, चांदणी, उजूबा, फेस फ्रेश, नूर हर्बल, न्यू फेस ब्युटी क्रीम यांसह विविध पाकिस्तानी क्रीम्स जप्त करण्यात आल्या. तसंच पारले गोल्ड, गोरे साबण आणि मल्लिका व्हिटॅमिन-उ सिरम यांचाही समावेश आहे. या क्रीम्सचा वापर करणाऱ्या काही तरुण-तरुणींनी आरोग्य बिघडल्याचा दावा केला आहे. गोरं होण्याच्या नादात वापरलेल्या या क्रीम्समुळे त्वचेवरच नाही तर थेट किडनीवरही परिणाम होत असल्याची माहिती तज्ज्ञ डॉक्टरांनी दिली आहे.

गोरं होण्याच्या हव्यासापोटी नागरिक स्वतःच्या आरोग्याशी खेळ करतायत का, असा गंभीर प्रश्न आता निर्माण झाला आहे. तज्ज्ञांच्या मते अशा क्रीम्स वापरून कायमस्वरूपी गोरे होता येत नाही, उलट त्वचा आणि किडनी दोन्ही धोक्यात येतात.

सरकारची बंदी आणि पोलिसांची कारवाई असूनही अशा उत्पादनांचा काळाबाजार सुरू असल्याचं चित्र आहे. त्यामुळे प्रशासनासमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे.

# गारपीट, वादळी वारे आणि विजांचा प्रहार; महाराष्ट्र हादरला, जीवितहानी

**मुंबई । प्रतिनिधी**



राज्यातल्या वातावरणात गेल्या काही दिवसांपासून सतत बदल होत असून अनेक ठिकाणी अवकाळी पावसाचा फटकाही बसला आहे. काल महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सोसाट्याचा वारा, पाऊस यासह गारपीटही झाली. त्याचा परिणाम शेतीवर, पिकांवर तर झाला आहेच पण माणसांनाही त्यांची झळ पोहोचली आहे. जालना, सातारा, राहाता / अहिल्यानगर, नांदेड या ठिकाणी पावसाने झोडपून कर काढलचं, पण वीज पडून काही ठिकाणी जनावरं दगावली. तसेच आत्तापर्यंत एकूण ४ जण दगावले आहेत. काही ठिकाणी शेळ्या, तर अहिल्यानगरमध्ये एका शेतकऱ्याच्या ९ गाईंचा दुर्दैवी मृत्यू झाला. पावसामुळे शेती पिकाचं नुसकान तर झालंच पण गुर ढोरं आणि घरातील माणसंही दगावल्याने अनेकांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

दरम्यान मालेवाडी येथे शेतात काम करत असताना वीज कोसळून शेतकरी शिवाजी खेडकर यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. ही घटना काल संध्याकाळी ६ च्या सुमारास घडली. दुर्दैवी घटनेत शेतकऱ्यासह त्यांच्या पाळीव कुत्र्याचाही मृत्यू झाला आहे. खेडकर हे नेहमीप्रमाणे आपल्या शेतात काम करत होते. मात्र अचानक वादळी वातावरण निर्माण होऊन वीज कोसळली. यात ते गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यूमुखी पडले. त्यांच्यासोबत असलेला पाळीव कुत्राही या घटनेत मृत झाला. शेतातील जनावरे घरी परतली, मात्र खेडकर हे बराच वेळ झाला तरी घरी न आल्याने नातेवाईकांना संशय आला. त्यांनी शेतात जाऊन पाहणी केली असता खेडकर मृत अवस्थेत आढळून आले.

# रस्त्यात अडवून लुटमार आणि अत्याचार; फ्रेजरपुरा हद्दीत संतापजनक घटना

**अमरावती । प्रतिनिधी**

अमरावतीत फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भानखेडा गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक धक्कादायक प्रकार घडला आहे. यात जंगल परिसरात एका तरुणी व तिच्या मित्राला अडवून मारहाण करत लुटमार केल्याची घटना घडलीय. सोबतच तरुणीवर जबरदस्ती अत्याचार केल्याचीही संतापजनक घटना उघडकीस आली आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळं गाठत पुढील पक्रिया केलीय. तपासाअंती या प्रकरणी गुन्हा दाखल करत या गंभीर गुन्ह्यातील पाच आरोपींना ताब्यात घेतलेय. या प्रकरणाचा पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत असून घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि तिचा मित्र अ‍ॅक्टिव्हा वाहनाने जात असताना अज्ञात पाच इसमांनी त्यांना अडवले. आरोपींनी दोघांनाही लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून त्यांच्या जवळील रोख रक्कम हिसकावून घेतली.




त्यानंतर एका आरोपीने तरुणीला बाजूला नेत तिच्यावर जबरदस्ती अत्याचार केला. सध्या पीडित तरुणीवर रुग्णालयात उपचार सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणी घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी गुन्हा दाखल करत या गंभीर गुन्ह्यातील पाच आरोपींना ताब्यात घेतलेय. या प्रकरणाचा पुढील तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत असून घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. हा गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्याने पीडिता, साक्षीदार तसेच आरोपींबाबतची माहिती पोलिसांकडून अधिकृतरीत्या जाहीर होईपर्यंत प्रसारित करू नये, अन्यथा संबंधितांवर प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

# शेतकऱ्यांच्या फार्मर आय.डी.वर तहसील कार्यालयाची हलगर्जी

## मनसे ने तहसीलदारांना लेखी पत्र देऊन कारवाईची मागणी केली

**रेवदंडा । निलेश फुंडे**

अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांना शासकीय योजनांपासून वंचित ठेवण्याचे काम तहसीलदार कार्यालय करीत आहे का? गेल्या ८-९ महिन्यांपासून ऑनलाइन आवेदन करूनही हजारो शेतकऱ्यांना 'फार्मर आय.डी.' मिळाले नाही. परिणामी, विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवता येत नाही, तर २०२५ च्या नैसर्गिक आपत्ती नुकसानीसाठीही भरपाई मिळवण्यात अडचणी आल्या. महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) शॅडो कैबिनेट सदस्य व जिल्हाध्यक्ष, माहिती अधिकारी संघर्ष समिती देवव्रत विष्णू पाटील यांनी आज (३० मार्च २०२६) तहसीलदार अलिबाग विक्रम पाटील यांना लेखी पत्र देत या प्रकरणात दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची व सर्व शेतकऱ्यांना तात्काळ ओळखपत्र वितरण करण्याची मागणी केली आहे.

देवव्रत पाटील यांनी सांगितले की, अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांनी ऑनलाइन प्रक्रियेद्वारे 'फार्मर आय.डी.'साठी अर्ज केले असली तरी तहसीलदार कार्यालयाकडून प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. यामुळे शेतकऱ्यांना शासकीय अनुदान, विमा, नुकसान भरपाईसह इतर लाभ मिळवता येत नाहीत. विशेषत: २०२५ मध्ये पावसाळ्यात झालेल्या नुकसानीसाठी ज्या शेतकऱ्यांना भरपाई मिळणार होती, त्यांना 'फार्मर आय.डी.' नसल्याने अतिरिक्त कागदपत्रांची पूर्तता करावी लागली. तलाठी व तहसीलदार कार्यालयांना अनेकदा भेटी देऊनही ओळखपत्र मिळाले नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना शारीरिक-मानसिक त्रास



सहन करावा लागला व आर्थिक नुकसान झाले.हलगर्जीपणाला परवानगी नाही!महाराष्ट्र नवनिर्माण सेना नेहमीप्रमाणे शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढते.

देवव्रत पाटील म्हणाले, तहसीलदार कार्यालयातील हलगर्जीपणा शेतकऱ्यांच्या खायच्या पायी पाणी पाडतोय. कामात दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी. तात्काळ सर्व प्रक्रिया पूर्ण करून प्रत्येक शेतकऱ्याला 'फार्मर आय.डी.' द्यावे, अन्यथा मनसे आंदोलन छेडेल! माहिती अधिकार संघर्ष समितीमार्फतही हे पत्र देण्यात आले असून, शासनाने या प्रकरणाला गंभीरतेने घ्यावे, अशी मागणी देवव्रत पाटील यांनी केली आहे.

अलिबाग तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात या प्रकरणाने त्रस्त आहेत. तहसीलदार कार्यालयाने आता तरी झोपेच्या गोळ्यांपासून सावध होऊन कारवाई करावी, अन्यथा शेतकऱ्यांचा रोष वाढेल!

# सिडकोच्या बामणडोंगरीत ढिसाळपणाने ४३ इमारतींना दुष्काळ; हंडा मोर्च्याने प्रशासन हादरले!

**रेवदंडा । निलेश फुंडे**

बामणडोंगरीत हजारो घरांना पाण्याचा भयावह तुटवडा; सिडकोच्या दुर्बल कारभाराने रहिवाशी संतापले - २० एप्रिलपर्यंत जलवाहिनी व ढढ प्लांट पूर्ण करा, अन्यथा तीव्र आंदोलन करणार ?बामणडोंगरीत पाण्याचा महासंकट सिडकोच्या फसवेगिरीमुळे हजारो कुटुंबे तहानलेले!शासनाच्या महसूल विभागाची दुर्लक्षता! लाखो रुपयांचे घर विकूनही पाणी नाही का?उलवेतील बामणडोंगरी सिडको वसाहतीतील अनंता टॉवर गृहप्रकल्पातील ४३ इमारतींमध्ये राहणाऱ्या सुमारे ५ हजारांहून अधिक कुटुंबांना भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

सिडकोच्या सडकाऊ नियोजन आणि रखरखावाच्या दुर्लक्षामुळे घर मिळून वर्षभर लोटला तरी पाण्याचा थेंबही टपकत नाही. संतप्त रहिवाश्यांनी शुक्रवारी उलवे सिडको कार्यालयावर हंडा मोर्चा काढून प्रशासनाच्या कानावर तुडुंब गरजेने हल्ला चढवला. या आंदोलनाने सिडकोला जाग आली असली तरी शासनाच्या महसूल विभागाचीही जबाबदारीच काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.सिडकोच्या सडकाऊ कारभाराने पाणी संकट गडद!या मोठ्या प्रकल्पात दिवाळी २०२२ आणि २०२४ मध्ये सोडत काढून घरवाटप झाले. २०२२ च्या विजेत्यांना मार्च २०२५ पासून ताबा मिळाला, तर २०२४ च्या विजेते सध्या घरांत दाखल होत आहेत. सुरुवातीला पाणीपुरवठा ठीक होता, पण ऑगस्ट २०२५ पासून तीव्र टंचाई सुरू. सिडकोने फेस १ आणि २ साठी सहा पाणी क्लस्टर बनवले, ज्यात प्रत्येकी ६ ते ८ इमारती. पण एका क्लस्टरला पाणी मिळत असताना दुसऱ्याला दुष्काळ!

सलग दोन दिवस पाणी नसल्याने रहिवाशांना विकत टँकर किंवा पाण्याची बाटल्या घ्याव्या लागतात. महिलांचा मोठा सहभाग असलेल्या



हंडा मोर्च्यात सिडकोची आश्वासने फक्त कागदावर! असा जाहीर निषेध झाला.मोर्च्यानंतर सिडकोने शिष्टमंडळाशी चर्चा करून आश्वासन दिले : रोजच्या पुरवठ्यावर देखरेख, बिघाडीला टँकर, फेस १ साठी नव्या जलवाहिनी २० एप्रिलपर्यंत, टर्शिअरी ट्रीटमेंट प्लांट ३० एप्रिलपर्यंत आणि गुणवत्ता तपासणी १५ मे २०२६ पर्यंत पूर्ण.

पण या तारखा गेल्या वर्षीही ऐकाव्यात तशाच! सिडकोचा हा ढिसाळपणा का? प्रकल्प उभारताना पाणीपुरवठ्याची मूलभूत योजनाच अपुरी ठेवली, की निधीचा गैर वापर?शासनाच्या महसूल विभागाचीही चूक; जबाबदारी कोणाची?सिडको ही महसूल विभागाची संस्था! तरीही नवी मुंबई महानगरपालिकेच्या (छचचउ) सीमेत असलेल्या या प्रकल्पात पाणी संकट असूनही शासनाची डोळे झाकून चाल? स्थानिक आमदार, खासदार किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी याची दखल घेतली नाही का? हा केवळ सिडकोचा दोष नाही, तर शासनाच्या पर्यवेक्षणातील खाच! लाखो रुपयांचे गृहप्रकल्प विकूनही मूलभूत सुविधा न देता रहिवाशांचा फसवा करणे म्हणजे भ्रष्टाचार नाही का? रहिवाश्यांनी मुदत ओलांडली तर तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शासनानेही तात्काळ हस्तक्षेप करून सिडकोला शासन आदेश जारी करावेत, अन्यथा जनतेचा रोष वाढेलच!

# थोडक्यात...

## एप्रिल २०२६ मध्ये 'विशेष डिजिटल शेती शाळा'




**मुंबई । प्रतिनिधी**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पानी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल २०२६ महिन्यात चार 'विशेष डिजिटल शेती शाळा' आयोजित करण्यात येत आहेत. राज्यातील कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागातील तज्ज्ञ आणि प्रगतशील शेतकरी यांचा यामध्ये सहभाग असून १ ते २२ एप्रिल २०२६ दरम्यान विशेष डिजिटल शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले आहे या शेतीशाळांचा सर्व शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे.

विशेष डिजिटल शेतीशाळांचे वेळापत्रक व विषय :- शेतीशाळा-१ (१ एप्रिल २०२६) : पेरणीपूर्व तंत्रज्ञान - बेड तयार करणे व बेडवर टोकण करणे, शून्य/कमीत कमी मशागत करणे, आंतरपीक पद्धत, बियाणे उगवण क्षमता तपासणी आणि बीजप्रक्रिया, शेतीशाळा- २ (८ एप्रिल २०२६): जैविक व नैसर्गिक निविष्ठा उत्पादन- बीजामृत, जीवामृत, लिंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, ट्रायकोडर्मा तयार करण्याच्या पद्धती व फायदे, शेतीशाळा- ३ (१५ एप्रिल २०२६): एकात्मिक कीड व्यवस्थापन- सापळा पिके, पक्षी थांबे, चिकट सापळे, मित्र किटकांचे संवर्धन, लिंबोळी आणि दशपर्णी अर्काचा वापर, शेतीशाळा- ४ (२२ एप्रिल २०२६) : भात शेतीसाठी सुधारित लागवड तंत्र- भाताची थेट पेरणी (डीएसआर), श्री पद्धत आणि भात लावणीसाठी यांत्रिकी पद्धत. सर्व शेतीशाळा वर नमूद तारखांना सायंकाळी ७.३० वाजता सुरु होणार असून या शेती शाळांचे लाइव्ह प्रसारण कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, पाणी फाउंडेशन आणि उमेदच्या यू-ट्यूब चॅनेलवर केले जाणार आहे.

हवामानातील वाढती अनिश्चितता, पावसाचा खंड आणि नैसर्गिक आपत्तींमुळे पारंपरिक कोरडवाहू शेती संकटात सापडली असून उत्पादन खर्च वाढत आहे. यावर मात करण्यासाठी कृषी विभागांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत महाराष्ट्र राज्याकरिता हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान सुरू करण्यात आले. हे अभियान शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची हमी देणे या उद्देशाने राबविण्यात येत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी कृषी विभागाबरोबरच, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, उमेद, माविम, पशुसंवर्धन विभाग इ. यंत्रणादेखील सहभागी होत आहेत. या अभियानाचा एक टप्पा म्हणजे हवामान अनुकूल तंत्रज्ञानावर आधारित विशेष डिजिटल शेतीशाळांचे आयोजन आहे. राज्यातील सर्व प्रकारच्या पीक पद्धतींना उपयुक्त असणाऱ्या तंत्रांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागातील तज्ज्ञ आणि प्रगतशील शेतकरी यांचेमार्फत या डिजिटल शेतीशाळामध्ये ज्ञानाचे आदान प्रदान होणार आहे.

शेतकरी, महिला गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सदस्य, कृषी मंडळे, बिजोत्पादक, फार्मर कप स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणारे निमंत्रक व शेतकरी गट, वनपट्टेधारक या सर्वांनी मोठ्या संख्येने डिजिटल शेती शाळांमध्ये भाग घ्यावा, असे आवाहन कृषी विभाग आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत करण्यात येत आहे.

# १५० दिवस सेवाकर्मी कार्यक्रमात महिला व बालविकास विभाग प्रथम

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवस सेवाकर्मी कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांचा राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकताच गौरव करण्यात आला.

हा सेवाकर्मी उपक्रम राज्यातील शासकीय सेवांची प्रगती सर्वांगीणपणे मोजण्यासाठी तसेच पारदर्शक, कार्यक्षम आणि जबाबदार प्रशासनाला चालना देण्यासाठी राबविण्यात आला होता. या अंतर्गत विभागाच्या संघटनात्मक रचना, सेवाप्रवेश नियम, पदोन्नती व थेट भरती स्थिती, गोपनीय अहवालांचे व्यवस्थापन, अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया, ळत्रङ्घजढ पोर्टलवरील प्रशिक्षण तसेच विभागीय चौकशी प्रकरणांच्या निपटाऱ्यासारख्या महत्त्वाच्या बाबींचा सखोल आढावा घेण्यात आला.

तसेच 'सेवाकर्मी टेक' घटकाद्वारे तंत्रज्ञानाचा वापर आणि डिजिटल प्रशासनाची प्रगती तपासण्यात आली. यात पदोन्नती ट्रॅकिंग, 'डिजिटल महापर'द्वारे गोपनीय अहवालांचे डिजिटायझेशन, ळत्रङ्घजढ प्रशिक्षण पूर्णता आणि ए-क्ठचड प्रणालीचा प्रभावी वापर यांचा समावेश होता.

या मूल्यमापनात प्रथम क्रमांक मिळवणे हे महिला व बालविकास विभागाच्या सक्षम प्रशासन पद्धती, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि उत्कृष्ट सेवा देण्याच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे प्रतीक आहे. या यशाबद्दल महिला व बालविकास विभागाच्या टीमचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, महाराष्ट्रातील नागरिकांसाठी अधिक पारदर्शक, प्रतिसादक्षम आणि नागरिक-केंद्रित प्रशासन बळकट होत असल्याचे अधोरेखित करण्यात आले.